सं.फौ.प्रकरण क्र.५१९/२०२२
सरकार वि. रहीसकुमार.
निशाणी क्र. १२ खाली

अभियोगपक्षाचा साक्षीदार क्रमांक ०१
मी याद्वारे शपथेवर कथन करतो की,
माझे नावः– उध्दव रंगनाथ डोंबे,
वयः– ४० वर्षे, धंदाः–शेती,
रा.बलसा, तह.जिंतुर, जि.परभणी.

**<u>सरतपास सरकार तर्फे सहा.सरकारी वकिल श्री.एस.डी.सौने यांच्या मार्फत सुरु–</u>**

घटना ही दिनांक १६/०६/२०२२ रोजी सकाळी १०.०० वा. सेलु ते जिंतुर रस्त्यावर घडली होती. मी आणि माझे वडील शेताकडे पायी पायी जात होतो व आम्ही मागे पुढे होतो. एक जेसीबी तेव्हा पाठीमागे येत होती आणि तिने माझ्या वडीलांना धडक दिली. तिचा क्र.एमएच–२०–व्हीवाय–५८९२ असा होता. त्यामुळे माझ्या वडीलांचा पाय मोडला व त्यांच्या कंबरेला मार लागला. त्यांचे पाय कामातुन गेले. पुढे त्यांना परभणी येथे उपचारासाठी भरती करण्यात आले. आता मला फिर्याद आणि एफ.आय.आर. दाखवण्यात आले. त्यावर माझ्या सहया असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यांना अनुक्रमे नि.क्र.१६ आणि १७ देण्यात येतो. मी धडक देणा–याला ओळखत नाही.
सरतपास समाप्त.

**<u>उलट तपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. ए. बी. नेटके यांच्या मार्फत सुरु–</u>**

आम्ही घरुन शेताकडे निघण्यासाठी सकाळी १०.०० वा. निघालो होतो. आमचे शेत घरापासुन १.५ कि.मी. अंतरावर आहे. आमच्या घरापासुन घटनास्थळ न्यायालयापासुन बस स्टॅन्डच्या अंतरावर आहे. आमच्या घरापासुन घटनास्थळापर्यंत पायी जाण्यासाठी १० मिनीटांचा वेळ लागतो. आमचे शेत घरापासुन पुर्व दिशेला आहे. माझे वडील माझ्या ५० फुट अंतरावर होते. हे म्हणणे खरे आहे की तेव्हा रस्त्याचे काम सुरु होते

व जागोजागी खड्डे व गिट्टी टाकली होती. हे म्हणने खरे आहे की त्यामुळे वाहनांची गती कमी होती. मी लगेच माझ्या वडीलांना सरकारी दवाखान्यात आणले होते. मी पाच मिनीटात जिंतुर येथील सरकारी दवाखान्यात पोहचलो होतो. जेसीबीला समोरुन आणि मागुन तोंड असते. सरकारी दवाखान्यात मी अर्धा तास थांबलो. त्यानंतर परभणी येथे माझ्या वडीलांना पाठवण्यात आले. हे म्हणने खरे आहे की माझ्या वडीलांनी विम्याचे प्रकरण दाखल केले आहे. हे म्हणने खरे नाही की माझ्या वडीलांना अज्ञात वाहनाने धडक दिली आहे. हे म्हणने खरे नाही की सरतपासातील मजकुर मी खोटा सांगितला आहे. हे म्हणने खरे नाही की कुठल्याही जेसीबीने माझ्या वडीलांना धडक दिली नाही. हे म्हणने खरे नाही की मी खोटा वाहनाचा क्रमांक सांगितला आहे. हे म्हणने खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास समाप्त.

फेरतपास काही नाही.

दिनांक १२/०८/२०२६ समक्ष व श्रावणोत्तर स्वीकृत

Digitally signed by NIKHIL PRADEEP TALNIKAR
Date: 2026.08.12 13:23:20 +0530

(नि. प्र. तळणीकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
जिंतुर.